जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JUN 2021
पुढारी



कोल्हापूर: विद्यापीठात राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त शाहू महाराजांच्या प्रतिमेस अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, जी. आर. पळसे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# विद्यापीठात राजर्षी शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा संचालक जी. आर. पळसे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. अवनिश पाटील डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठातील राजर्षी शाहू संशोधन केंद्रात शाहू जयंतीनिमित्त महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. एस. एस. महाजन, डॉ. अवनिश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील उपस्थित होते. राजर्षी शाहू महाराज यांच्या दसरा चौकातील पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिवादन केले. याप्रसंगी डॉ. अशोक चौसाळकर, शाहीर आझाद नायकवडी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JUN 2021
पुढारी

# फुले, शाहू, आंबेडकरांच्या मार्गानेच राष्ट्रीय एकात्मता जोपासणे शक्य

## डॉ. जयसिंगराव पवार; शाहू जयंतीनिमित्त व्याख्यान



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्राची एकता, अखंडता, बंधुता जोपासण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांनी आखून दिलेल्या मार्गावरूनच चालावे लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. पवार म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या हयातीमध्ये जे राजकीय, सामाजिक योगदान दिले. त्या कार्याची व्याप्ती पाहता ते खऱ्या अर्थाने राष्ट्रबांधणीचे, राष्ट्र उभारणीचे कार्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या बांधणीला घटनेच्या साच्यात सुस्वरूप आकार देण्याचे कार्य केले. आज त्या कार्याला आव्हान देण्याचे घातक प्रयत्न होत आहेत. आपले राष्ट्र हे कोण्या एका धर्माचे नसून सर्व धर्मियांचे आहे, अशी समभावाची भावना जोपासली जाणे, वृद्धिंगत होणे महत्त्वाची बाब आहे. राष्ट्र टिकवायचे असेल तर आपण एक आहोत, ही भावना दृढमूल होणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, समाजातल्या सर्व घटकांच्या कल्याणाचा विचार हा राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा पाया होता. शाहू महाराजांचा परीसस्पर्श झाला नाही, असे कोणतेही क्षेत्र नाही. कला, संगीत, शेती, सहकार, जलसिंचन, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान हे राष्ट्रनिर्मितीचे कार्य आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JUN 2021
पुढारी

# पुणे पोलिस उपायुक्त मितेश घट्टे यांचे आज विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागातील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्यावतीने सोमवारी (दि. २८) दुपारी चार वाजता पुण्याचे पोलिस उपायुक्त मितेश घट्टे यांचे 'गुन्हेगारी बातम्या आणि पत्रकारांची जबाबदारी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान होणार आहे, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

इस्लामपूर येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून घट्टे यांनी बी. ई. (मॅकेनिकल) ही पदवी प्राप्त केली आहे. त्यांना अध्यापनाचा दहा वर्षांचा अनुभव आहे. २००८ मध्ये ते पोलिस उपअधीक्षकपदी रुजू झाले. ठाणे ग्रामीण, चिपळूण आणि कराड आदी ठिकाणी त्यांनी सेवा बजावली आहे. पत्रकारांनी गुन्हेविषयक बातम्या संकलित करत असताना नेमकी कोणती काळजी घ्यावी, याविषयी ते मार्गदर्शन करणार आहेत. पत्रकारिता विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JUN 2021
पुढारी

# शाहू महाराजांच्या धोरणांचे जागतिक लोकशाही मूल्यांशी नाते

## डॉ. सुधीर गव्हाणे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू महाराज यांनी त्यांच्या छोट्याशा करवीर संस्थानामध्ये राबविलेली धोरणे ही लोकशाही मूल्यांचे संवर्धन करणारी होती. जागतिक मूल्यांशी नाते सांगणारी होती. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ होते, असे प्रतिपादन नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांनी केले.

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'राजर्षी शाहू महाराज : सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. डॉ. गव्हाणे म्हणाले, राजकीय लोकशाहीइतकेच महत्त्व सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी प्रकारच्या लोकशाहीला आहे. अशा लोकशाहीचा विकास आपल्या राज्यामध्ये करण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये केला. बहुजनांच्या कल्याणासाठी त्यांनी लढा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचा 'सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ' अशा शब्दांत गौरव केला. शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी आभार मानले.

**शाहू महाराजांच्या नावे राज्यात एकही विद्यापीठ नाही**

मायावती यांच्या राजकारणाबद्दल दुमत असू शकेल; मात्र त्यांनी उत्तर प्रदेशामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या नावे विद्यापीठ स्थापन केले. शाहू महाराजांच्या नावाचा जिल्हा स्थापन केला. महाराष्ट्रात मात्र शाहू महाराजांच्या नावे एकही विद्यापीठ नाही, याची खंत डॉ. सुधीर गव्हाणे यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JUN 2021
तरुण भारत

# सप्टेंबरमध्ये महाविद्यालये सुरु; लवकरच निर्णय

**पुणे :** लॉकडाऊनमुळे बंद असलेली महाविद्यालये १५ सप्टेंबरपासून सुरु करण्याबाबतचा निर्णय लवकरच जाहीर केला जाईल. तसेच प्राध्यापकांच्या ३ हजार ६४ रिक्त पदांची भरती प्रक्रियाही लवकरच सुरु करण्यात येईल, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. तसेच जुलै किंवा ऑगस्टमध्ये सीईटी परीक्षा होईल, अशीही माहिती त्यांनी दिली.



दरम्यान, भरतीच्या निर्णयाचे स्वागत करत नेट–सेट पीएचडी पात्रताधारक संघर्ष समितीने आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. सामंत म्हणाले, भरती संदर्भात दोन दिवसांत वित्त विभाग आणि उपमुख्यमंत्री अजित पवार निर्णय घेणार आहेत. २०२० या वर्षापर्यंत एकूण रिक्त पदे गृहित धरुन ७०० पदांचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना ४८ मिनिटांची तासिका याप्रमाणे मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला.